भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०६/२०१७

१) जुण्या भांडणाच्या धारदार शस्त्राने पोटावर मारून जिव घेण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक २७/०६/२०१७ चे ०२.२१ वा. दर. यातील फिर्यादी जखमी शामा कोखुजी भगत वय ४५ वर्ष रा. तहसील कार्यालय जवळ तुमसर हे हॉटेलमधुन जेवन घेवुन येत असता यातील आरोपीने जुण्या भांडणावरून शिवीगााळ करून धारदार शस्त्राने फिर्यादीचे पोटावर मारून जिवानाशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. हावरे यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हैसकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) संगनमत करून क्षुल्लक कारणावरून भांडण करून लोखंडी रॉडने डोक्यावर मारून दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक २७/०२/२०१७ चे ०१.४२ वा.यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी हर्षल मिलींद बागडे वय २५ वर्ष रा. हषारा टोली तुमसर तु माझे बहीनीचे मागे का लागला या कारणावरून भांडण करून आरोपी क्र. २ ने ४ फिर्यादीस धरून ठेवले व आरोपी क्र.१ नी लोखंडी रॉडने जखमी चे हातावर पायावर डोक्यावर मारून जखमी केले त्यात मधस्थी करण्याात आलेला सागर पंधरे याला सुध्दा हातावर रॉडने मारून जखमी केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. हावरे यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

३) लाचेची रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक २७/०६/२०१७ चे २०.४२ वा. दर. यातील आरोपीने तक्रारदार अक्षय नरेश उके वय २२ वर्ष रा. परसटोला यांना त्याचा मामेभाऊ यांचे विरूध्द पो.स्टे. साकोली येथिल अ.क्र. १८४/१६ कलम ३९४,३२४,३४ भादवि. मधिल नोंद गुन्हयातील अटक आरोपी विशाल देवदास मेश्राम यांना गुन्हयातुन सही सलामत बाहेर काढण्याकरिता तक्रारदारास प्रलोभन देवुन प्रवृत्त करून पडताळणी कार्यवाही वेळी १५,०००/रू. लाचेची रक्कम स्विकारल्यामुळे सरतर्फे फिर्यादी पोनि. पारधी ए.सी.बि. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ८ ला. प्र. का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. पारधी ए.सी.बि. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) मागील दाराची कडी उघडुन (दोन घरच्या) बेडरूम मधील आलमारीतील सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २७/०६/२०१७ चे १४.१० वा. दर. यातील फिर्यादी राजेंद्र रामाजी तिजारे वये ३२ वर्ष रा. पिंपरी जुनी हा रात्री छपरात झोपला असता फिर्यादी व त्याचे घराचा मागील दार उघडुन कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन आत प्रवेश करून बेडरूम मध्ये ठेवलेल्या आलमारीतुन १ सोन्याची पोत १० ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ०६ ग्रॅम, सोन्याची पोत १० ग्रॅम, १ सोन्याची एकदानी ८ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप्स ३ ग्रॅम, १ लॉकेट ०१ ग्रॅम, चांदीचे पायपटया ३ जोड वजन १२ तोडे, व नगदी ५०००/रू. व शेजारील मंगेश मारोती लांडगे यांचे घरातील गोदरेज आलमारी मधुन १ सोन्याची एकदानी १० ग्रॅम, सोन्याची नथ ७ ग्रॅम, एक जोड चांदीच्या पायपटया ५ तोडे व नगदी ३०,०००/रू. असा एकुन दोन्ही घरातील १,३१,४००/रू. चा माले चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन

जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) हनुमान मंदीराचे चॅनल गेट उघडुन दानपेटी व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०६/२०१७ चे १६.३० वा . दर. यातील कोणतरी अज्ञात चोराने हनुमान मंदिराचे चॅनल गेट उघडुन मंदिरातील मोठी दान पेटी उघडुन त्यातील अंदाजे २७००/रू. व वरच्या मजल्यावरील राम लक्ष्मन मंदिरातील लहान दानपेटी सह ज्यात अंदाजे ३००/रू. व दानपेटी किंमती १०००/रू. असा एकुन ४०००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी अनिल भैयाजी कहु वय ६४ वर्ष रा. नेहरू वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरून_पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

६) अंधाराचा फायदा घेवुन आपले अस्तित्व लपवुन संशयास्पंद स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०६/२०१७ चे ०१.३१ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीसे स्टॉपसह सरकारी वाहनाने डिव्हीजन रात्रगस्त करित असतांना यातील आरोपी हे अंधाराचा फायदा घेवुन आपले अस्तित्व लपवितांना संशयरित्या मिळुन आल्याने त्यानी उडवा उडवीचे उत्तरें देत त्याचे कडे स्वत:चे कोणतेही ओळखपत्र मिळुन न आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. पुसाटे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पो. स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटके आहे.

७) ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे कार चालकास साईडने धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २७/०६/२०१७ चे २१.४५ वा. दर. यातील फिर्यादी राजेंद्र गोविदराव दिवने वय ४४ वर्ष रा. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर कार चालक हा आपली कार क्र. एमएच ३४ एएम ५१४५ मध्ये कुंटुबासह कारने तुमसर येथे रा.म.क्र. २७१ रोडने जात असता विरूध्द दिशेने येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवित आणुन कारचे समोरील ड्रायव्हर बाजुला धडक देवुन कारचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. मोहाडी येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

८) विहीरीचे पाण्यात ईसमाचा मृत्यु :—

दिनांक २६/०६/२०१७ चे १६.०० ते २७/०६/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील मृतक मनोहर नानु शिवनकर वय ४५ वर्ष, रा. नरवा हा दि. २६/०६/२०१७ चे १६.०० वा. पर्यत घरी जेवन करण्यास आला नाही म्हणुन त्याचा गावात व आजुबाजुच्या गावात शोध घेतला असता मिळुन आला नाही. दि. २७/०६/२०१७ चे ०८.०० वा. दर. मृतक हा तावशी येथिल विहीरीत मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी गजानन महादेव हेमणे वय ५९ वर्ष रा. लोहारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

९) विद्युत शॉक लागुन मुलाचा मृत्यु:—

दिनांक २७/०६/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील मृतक सौरभ अभय नेवारे वय १० वर्ष, रा. आमगाव (दिघोरी) हा स्वत:चे घरी चार्जीग लाईटची लहान बॅटरी चार्जीग करित असता इलेक्ट्रीक शॉक लागुन मरण पावल्याने फिर्यादी अभय काशीराम नेवारे वय ३२ वर्ष रा. आमगाव यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**१०) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा व दिघोरी येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती २०००/–रु. १७ लिटर १०० मिली लीटर विदेशी दारु किंमती ५४,९००/–रु. मसेच जुगारातुन २५५/रू. माल, असा एकुण किंमती ५७,१५५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०० तीन सिटर वाहनांवरती २३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.


(एम.एम. सिडाम) 28/6

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**

**भंडारा करीता**

**दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२**


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.